दै.रजि.नं.:-
दिनांक :- .01.2026

समरी दिवानी दावा नंबर /2026

(Suit Under Order 37 Of The Civil Procedure Code 1908)

## मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हिजन डिव्हिजन, इचलकरंजी यांचे न्यायालयात इचलकरंजी...

श्री व्यंकटेश टेक्सफॅब करिता प्रोप्रा.
**सौ नेहा प्रविण तापडीया**
व.व. 39, धंदा-घरकाम व व्यापार
रा. फ्लॅट नं.7, गट नं.670/4, शगुन रेसिडन्सी
बोहरा मार्केट जवळ,
इचलकरंजी 416115
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर (महाराष्ट्र) } **वादी**

...विरूध्द...

मे.हिना ट्रेडर्स करिता प्रोप्रा.
**मेहरूद्दीन अनसारी**
व.व. 45 धंदा- व्यापार
रा. 49/80, नौघरा
मु.पो.कानपूर राज्य-उत्तरप्रदेश 208001 } **प्रतिवादी**

ORDER
Issue suit summons to defendant as per Order 37 Rule 2 of C.P.C.

Sd/-
4th C.J.J.D., Ichalkaranji

सिव्हिल प्रोसिजर कोड ऑर्डर 37 नुसार रक्कम वसुलीचा दावा
कोर्ट फी व ज्युरिसडिक्शन करिता दावेची आकारणी रक्कम रूपये 1,48,485/-
(अक्षरी रक्कम रूपये एक लाख अठठेचाळीस हजार चारशे पंच्याऐंशी फक्त)

### यातील वादी यांचा दावा असा की :-

27/1/26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

1) यातील वादी यांचा इचलकरंजी शहरामध्ये ''श्री व्यंकटेश टेक्सफॅब'' या नावे व्यवसाय असून सदरील व्यवसायाचे स्वरूप ''कापड माल खरेदी-विक्री'' करणे असा होय. सदरील ''श्री व्यंकटेश टेक्सफॅब'' या फर्मचे प्रोप्रायटर ''सौ नेहा प्रविण तापडीया'' या असून सदरील वादी फर्म ही मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 व जीएसटी अंतर्गत नोंदणीकृत आहे. सदरील दावेतील सर्व व्यवहाराची प्रत्यक्षात माहिती मला व वादीचे पती ''श्री प्रविण कैलासचंद तापडीया'' यांना मॅनेंजर या नातेने होती व आहे. सबब, दावेतील सर्व व्यवहार वादी व त्यांचे पती हे दोघेही पाहतात .

2) वादींनी प्रस्तुतचा दावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908 चा आदेश XXXVII नियम 2 प्रमाणे रक्कम वसुलीचा मे. कोर्टात दाखल केलेला आहे. वादींनी दावेमध्ये अशी कोणतीही दाद मागणी केलेली नाही की जी आदेश XXXVII अंतर्गत समाविष्ट नाही.

3) यातील प्रतिवादी यांचा ''हिना ट्रेडर्स'' या नावाने व्यवसाय आहे. ''हिना ट्रेडर्स'' या फर्मचे **मेहरूद्दीन अनसारी** हे प्रोप्रायटर आहेत. ''हिना ट्रेडर्स'' या फर्मचा संपूर्ण दैनंदिन व्यवहार चालक, मालक, प्रोप्रायटर या नात्याने **मेहरूद्दीन अनसारी** हे स्वत:च करतात त्यामुळे दावेत नमूद व्यवहार वादीसोबत प्रतिवादींनी केलेला असल्याने त्याची प्रत्यक्ष माहिती प्रतिवादींना आहे. सबब, प्रतिवादी हे स्वत: दावेत नमूद व्यवहारास सर्वस्वी जबाबदार आहेत.

4) यातील प्रतिवादी यांनी वादी यांचेकडे ''हिना ट्रेडर्स''या नावाने खाते ठेवून वेळोवेळी कापडमाल हा उधारीने खरेदी केलेला आहे. यातील वादी यांनी प्रतिवादीस वेळोवेळी कापडमाल हा खालील नमूद वर्णनाच्या बिलानुसार प्रतिवादीच्या सुचनेनुसार पाठविलेला आहे. यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेकडून घेतलेल्या बिलाच्या रक्कमेचे व ई-वे बिलाचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Bill No. | Date | Amount | E-Way Bill | E-Way Bill Date |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 298 | 27.02.2023 | 46,363/- | 211554767572 | 03.03.2023 |
| 2 | 299 | 27.02.2023 | 56,986/- | 211554767770 | 03.03.2023 |
| 3 | 300 | 27.02.2023 | 35,770/- | 261554768059 | 03.03.2023 |
| 4 | 314 | 03.03.2023 | 88,180/- | 201556996085 | 04.03.2023 |

येणेप्रमाणे असे...

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

5) यातील वादी यांनी दावेत नमूद असणारे बिलाचा कापडमाल हा प्रतिवादीच्या सुचनेनुसार पाठविलेला असून सदरील कापडमाल हा प्रतिवादी यांना मिळालेला देखील आहे इतकेच नव्हे तर सदरील सर्व बिलाचे जीएसटी क्रेडीट देखील प्रतिवादीने घेतलेले आहे व त्याची नोंद ज्या त्या वेळी जीएसटी आर-1 मध्ये देखील झालेली आहे. यातील प्रतिवादी यांनी जो कापड वादीकडून घेतला त्याची रक्कम ही बिलाच्या वरती नमूद तारखेस देणे प्रतिवादीवरती बंधनकारक होते व अशा प्रकारची अट बिलावरती देखील स्पष्टरित्या नमूद आहे. यातील प्रतिवादी यांनी जर बिलामध्ये ठरलेल्या मुदतीत बिलाच्या रक्कमा दिल्या नाहीत अगर देणेस विलंब झाला तर बिलाच्या रक्कमेवरती नुकसान भरपाई म्हणून विलंब चार्ज लावणेचा अधिकार यातील वादी यांना होता व आहे. यातील वादी यांनी जसजसे व्यवहार होतील तसतशा सर्व नोंदी दैनंदिन खात्यामध्ये केलेल्या असून प्रतिवादी हे वादीची आजमितीस खातेबाकीनुसार एकूण रक्कम रूपये 58,177/- इतकी लागतात.

6) सदर वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे वेळोवेळी वरील नमूद रक्कमेची मागणी केली असता सदरील देय रक्कम आज देतो उद्या देतो असे सांगून रक्कम देणेबाबत प्रतिवादी यांनी वारंवार टाळाटाळ केलेली आहे. सदर प्रतिवादी यांनी वादी यांची वेळोवेळी मागणी करून ही देय रक्कम दिली नाही तसेच वादी यांना प्रतिवादी हे रक्कम देणार नाहीत याची खात्री झालेनंतर नाईलाजाने वादी यांनी ॲड.नितीनकुमार कल्याणमल लड्डा रा.इचलकरंजी यांचे मार्फत दिनांक 06.12.2025 इसवी रोजी रजि.ए.डी.ने. नोटीस प्रतिवादी यांना पाठवून देय रक्कमेची व्याजासह मागणी केली. सदरील नोटीस ही प्रतिवादी यांना दिनांक 11.12.2025 इसवी रोजी पोहोचलनंतर त्यांनी वादीच्या नोटीसला उत्तर दिले नाही अगर रक्कम देखील भागविली नाही. सबब, वादीची देय रक्कम देणेसाठी प्रतिवादी हे वैयक्तिकरित्या व संयुक्तरित्या जबाबदार आहात. सबब, वादी यास प्रतिवादी यांचे विरूध्द सी.पी.सी आर्डर **XXXVII** रूल 2 नुसार रक्कम वसुलीचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

## 7) दावेस कारण :-

यातील प्रतिवादी यांनी वादी यांचेकडे ''हिना ट्रेडर्स'' या नावाने खाते ठेवून वेळोवेळी कापडमाल हा उधारीने खरेदी केलेलाअसून यातील वादी यांनी प्रतिवादी यांचे नावचा

27/1/26

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

खातेउतारा ठेवलेला असून प्रतिवादी हे वादी यांची खाते बाकीनुसार एकूण रक्कम रूपये 58,177/- इतके देणे लागतात. तद्नंतर वादी यांनी प्रतिवादी यांचेकडून खातेबाकीनुसार येणे रक्कमची व्याजासह नोटीसीने मागणी केली असता सदरील नोटीस प्रतिवादी यांना मिळालेली असूनही प्रतिवादी यांनी रक्कम भागवीली नाही. सबब, प्रतिवादी यांना नोटीसीचे कायदेशीरित्या ज्ञान होवून देखील सदरील नोटीसप्रमाणे त्यांनी रक्कम भागविली नाही त्यावेळी व त्यानंतर वेळोवेळी वर नमूद वादीच्या दावेस कारण घडलेले आहे व घडत आहे.

## 8) दावेची आकारणी व तपशिल :-

| | |
|---|---|
| रक्कम रूपये 58,177/- | यातील प्रतिवादी हे वादी यांना खातेबाकीनुसार देय लागत असलेली रक्कम रूपये सदरील नमूद. |
| रक्कम रूपये 7,899/- | बिल नंबर 298 वरती द.सा.द.शे.24% नुसार रक्कम रूपये 20,000/- वरती दिनांक 27.02.2023 ते 04.11.2023 पर्यतचे व्याज रक्कम रू. 3288/- व रक्कम रूपये 26,363/- वरती दिनांक 27.02.2023 ते 20.11.2023 पर्यतचे व्याज रक्कम रू. 4611/- असे एकूण सदरील नमूद. |
| रक्कम रूपये 15,329/- | बिल नंबर 299 वरती द.सा.द.शे.24% नुसार रक्कम रूपये 20,000/- वरती दिनांक 27.02.2023 ते 16.03.2024 पर्यतचे व्याज रक्कम रू. 5024/- व रक्कम रूपये 20,000/- वरती दिनांक 27.02.2023 ते 12.04.2024 पर्यतचे व्याज वक्कम रू. 5379/- व रक्कम रूपये 20,000/- वरती दिनांक 27.02.2023 ते 14.05.2024 पर्यतचे व्याज रक्कम रू. 4926/- असे एकूण सदरील नमूद. |
| रक्कम रूपये 7,732/- | बिल नंबर 300 वरती द.सा.द.शे.24% नुसार रक्कम रूपये 20,000/- वरती दिनांक 27.02.2023 ते 16.01.2024 पर्यतचे व्याज रक्कम रू. 4248/- व रक्कम रूपये 15770/- वरती दिनांक 27.02.2023 ते 29.01.2024 पर्यतचे व्याज रक्कम रू. 3484/- असे एकूण सदरील नमूद. |

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

| | | |
|---|---|---|
| रक्कम रूपये | 56,348/- | विल नंबर 314 वरती द.सा.द.शे.24% नुसार रक्कम रूपये 10,000/- वरती दिनांक 03.03.2023 ते 18.01.2025 पर्यतचे व्याज रक्कम रू. 4,504/- व रक्कम रूपये 10,000/- वरती दिनांक 03.03.2023 ते 18.03.2025 पर्यतचे व्याज रक्कम रू. 4892/- व रक्कम रूपये 10,000/- वरती दिनांक 03.03.2023 ते 02.12.2025 पर्यतचे व्याज रक्कम रू. 6,595/- व रक्कम रूपये 58,177/- वरती दिनांक 03.03.2023 ते 16.01.2026 पर्यतचे व्याज रक्कम रू. 40,357/- असे एकूण सदरील नमूद. |
| रक्कम रूपये | 3,000/- | नोटीस फी |

रक्कम रूपये 1,48,485/- एकूण आकारणी

9) यातील वादी यांनी दावेची आकारणी कोर्ट फी व ज्युरिसडिक्शन करीता रक्कम रूपये 1,48,485/- इतकी केलेली असून त्यावरती मुंबई कोर्ट फी स्टॅम्प ॲक्ट व सुट व्हॅल्युएशन ॲक्टचे कलम 8 (XIII) प्रमाणे रक्कम रूपये ...7430.../- चा योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावलेला आहे.

10) यातील वादी हे इचलकरंजी येथील रहिवाशी व व्यापार करीत असून वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेला व्यवहार इचलकरंजी येथील मा.कोर्टाच्या स्थळसिमेतील असलेने व अधिकार कक्षेबाबत स्पष्ट बिलावरती नमूद असलने सदराचा दावा चालविणेचा व त्यावर न्यायनिर्णय देणेचा अधिकार मा.कोर्टांना आहे.

## 11) सबब, वादीची विनंती की :-

अ) यातील वादी यांना प्रतिवादी यांचेकडून वैयक्तिकरित्या तसेच जंगम अगर स्थावर मालमत्तेतून रक्कम रूपये 1,48,485/- इतकी देवविण्याचा ठराव व हुकुमनामा व्हावा.

ब) तसेच दिनांक 16.01.2025 इसवी रोजीचे तारखेपासून ते संपूर्ण रक्कम मिळेपर्यंत पुढील व्याज रक्कम रूपये 58,177/- वरती द.सा.द.शे 24% प्रमाणे प्रतिवादी यांचेकडून वादी यास देवविण्याचा हुकुम व्हावा.

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji
24/1/26

क) सदरील दावेचा कोर्ट खर्च प्रतिवादी यांचेकडून वसूल होवून मिळावा.

ड) जरूर तर प्रतिवादीच्या कैफियती वरून अगर अन्य कारणांवरून दावा दुरस्तीस परवानगी असावी.

इ) न्यायाअंती योग्य तो हुकुम हे वादी यांचेकडूनच व्हावेत ही विनंती.

येणेप्रमाणे असे.

ठिकाण :-इचलकरंजी

दिनांक :- 27.01.2026

For Shri Venkatesh Texfab

स.जा.व्हावे.

Proprietor

सौ नेहा प्रवीण तापडीया

सोबत वकील पत्र, कागदपत्राची यादी व त्याचप्रमाणे कागद तसेच पत्ता मेमो व प्रतिवादीसाठी नकला वगैरे जोडलेल्या आहेत.

**Drafted And Presented By**

Adv. Nitinkumar K. Laddha
Ichalkaranji 416 115

## सत्यप्रतिज्ञा

मी श्री व्यंकटेश टेक्सफॅब करिता प्रोप्रा.सौ नेहा प्रवीण तापडीया व.व 39,धंदा-घरकाम व व्यापार रा.प्लॅट नं.7, गट नं.670/4, शगुण रेसिडन्सी, बोहरा मार्केटजवळ, इचलकरंजी 416115 ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर (महाराष्ट्र) सत्यप्रतिज्ञेवरती कथन करते की, वरील दावे मधील नमूद केलेला सर्व मजकुर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्यप्रतिज्ञा सही ता. 27.01.2026

ठिकाण :- इचलकरंजी

दिनांक :- 27.12.2025

For Shri Venkatesh Texfab

स.जा.व्हावे

Proprietor

सौ नेहा प्रवीण तापडीया

## ॲफिडेव्हीट

मी श्री व्यंकटेश टेक्सफॅब करिता प्रोप्रा.सौ नेहा प्रवीण तापडीया व.व. 39, धंदा-घरकाम व व्यापार रा.प्लॅट नं.7, गट नं.670/4, शगुण रेसिडन्सी, बोहरा मार्केटजवळ, इचलकरंजी 416115 ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर (महाराष्ट्र) सत्यप्रतिज्ञेवरती कथन करते की, वरील

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

दावेतील कलम 1 ते 6 मध्ये नमूद केलेला सर्व मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा बरोबर आहे तसेच दावेतील कलम 7 ते 11 मध्ये नमूद केलेला मजकुर मला मिळालेल्या कायदेशीर सल्ल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे तसेच दावेतील कलम 12 ही माझी वैयक्तिक मागणी आहे म्हणून केले ॲफीडेव्हीट सही व तारीख 27.01.2026

ठिकाण :-इचलकरंजी

दिनांक :- 27.01.2026

मे.जा.व्हावे.

For Shri Venkatesh Texfab

Proprietor

सौ नेहा प्रवीण तापडीया

मी ॲफिडेव्हीट करणार यास ओळखतो

ॲड नितीनकुमार क.लड्डा ,

इचलकरंजी 416115

## सत्यप्रतिज्ञा

मी श्री व्यंकटेश टेक्सफॅब करिता प्रोप्रा.सौ नेहा प्रवीण तापडीया व.व. 39, धंदा-घरकाम व व्यापार रा.प्लॅट नं.7, गट नं.670/4, शगुण रेसिडन्सी, बोहरा मार्केटजवळ, इचलकरंजी 416115 ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर (महाराष्ट्र) सत्यप्रतिज्ञेवरती कथन करते की, वरील दावे मधील नमूद केलेला सर्व मजकुर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्यप्रतिज्ञा सही ता. 27.01.2026

ठिकाण :-इचलकरंजी

दिनांक :- 27.01.2026

मे.जा.व्हावे.

For Shri Venkatesh Texfab

सौ नेहा प्रवीण तापडीया

Proprietor

Solemnly Affirmed before me
Shri Sau. Neha Pravin Tapdiya
of Ichalkaranji who is
identified by Shri N. K. Laddha
ADV. whom I know personally
Dated :- 27/1/26

Superintendent,
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji